<u>प्रेस नोट</u> अंबोली पोलीस ठाणे, मुंबई

दिनांक २३/१२/२०२१ रोजी पश्चिम नियंत्रण कक्ष येथुन अंबोली मोबाईल ०५ यांना संदेश प्राप्त झाला की, हील पार्क, जोगेश्वरी प. मुंबई येथे एक महिला ही आत्महत्या करत आहे. सदर ठीकाणी अंबोली मोबाईल ०५ पोहचली असता सदर महीलेच्या रूमचा दरवाजा आत मधुन बंद असल्याचा आढळून आल्याने कॉलर इसमाच्या मदतीने पोलीसांनी रूमचा दरवाजा तोडुन रूममध्ये प्रवेश केला असता सदर महिला ही बेडरूमच्या छतपंख्याला ओढनी बांधुन गळफास लावलेल्या अवस्थेत दिसून आली. सदर महिलेस उपचारकामी तात्काळ बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा हॉस्पिटल, जोगेश्वरी(पुर्व), मुंबई येथे घेवुन गेले. तेथील वैद्यकिय अधिकारी यांनी सदर महिलेस दाखल पुर्व मयत घोषीत केले. सदर बाबत अपमृत्यू नोंद क्र. ५७/२१ दाखल करून तपास सुरू केला. सदर अपमृत्युच्या तपासात सदर महिला या त्यांच्या दोन मैत्रीणीसह मुंबई येथील एका पंचतारांकीत हॉटेल मध्ये दिनांक २०/१२/२०२१ रोजी रात्रौ उशीरापर्यंत पार्टी करत असताना त्या ठिकाणी एन सी बी ची रेड झाल्याचे खोटे सांगुन एन सी बी अधिकारी असल्याचा खोटा बनाव करून सदर महिलेस कायदेशीर कारवाई न करण्याकरीता २० लाख रूपयांची मागणी आरोपीतांनी करून सदर रक्कम लवकरात लवकर देण्याकरीता सांगुन जावु देण्यात आले. सदर रक्कम मिळण्याकरीता संबंधीतांकडून वारंवार दबाव आण्यात आला. सदर घटनेस कंटाळून सदर महिलेने राहत्या घरात छत पंख्याला ओढणीच्या सहायाने गळफास लावुन आत्महत्या केली. सदर मयत महिलेचे कोणीही नातेवाईक/वारस मुंबई मध्ये हजर नसल्याने सदर बाबत सरकार तर्फे पोलीस फिर्यादी बनुन अंबोली पोलीस ठाणे गु.र.क्र. ७९१/२०२१ कलम ३०६, १७०, ४२०, ३८४, ३८८, ३८९, ५०६, १२०(ब), ३४ भादविं. दिनांक २४/१२/२०२१ रोजी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासात एन सी बी चे अधिकारी असल्याचे भासवुन बनाव करून हॉटेल मध्ये आलेले आरोपी नामे १) सुरज मोहन परदेशी, वय ३८ वर्षे, धंदा बांधकाम कॉट्रॅक्टर, राठि घर नं ९२, शिवाजी चौक, सहयाद्री मिल समोर, जुना आग्रा रोड, आसनगाव, ठाणे. २)प्रविण रघुनाथ वाळींबे, वयः– ३५ वर्षे, धंदाः– नोकरी, रा.ठिः– ८८८, आदर्श नगर, आसनगाव स्टेशन जवळ, जुना आग्रा रोड, दोरजे कॉलेजच्या समोर, आसनगाव, ठाणे यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली असून त्यांच्याकडे अधिक तपास करण्यात येत आहे. तपासात पाहिजे आरोपीतांचा शोध घेत आहोत. मृतकाच्या वारसांना माहिती देवून मृतदेह अंत्यविधी करिता देण्यात आला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०९ श्री मंजुनाथ सिंगे, सहायक पोलीस आयुक्त श्री बोंडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कामठे, यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक शर्मा, पोलीस उपनिरीक्षक गुरव, महिला पोलीस उपनिरीक्षक जाधव व पथक करत आहेत.